महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

Email ID:- sm2.sesd-mh@gov.in

दूरध्वनी क्र:-

दिनांक: २३ जानेवारी, २०२३

क्रमांक:-एसएफएस-१०२१/प्र.क्र.५३५/एसएम-२

## मान्यता पत्र (शुध्दीपत्रक)

प्रति,

अध्यक्ष / सचिव,

गुणाई शिक्षण प्रसारक मंडळ, कौळखेड, ता.उदगीर, जि.लातूर.

विषय- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरु करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

गुणाई शिक्षण प्रसारक मंडळ, कौळखेड, ता.उदगीर, जि.लातूर संचलित बिर्ला ओपन माइंडस इंटरनॅशनल स्कुल, जळकोट रोड, उदगीर, ता.उदगीर, जि.लातूर.

संदर्भ- १.मान्यता पत्र क्रमांक एसएफएस-१०२१/प्र.क्र.५३५/एसएम-२,दि. २१.०२.२०२२.

२. अध्यक्ष, गुणाई शिक्षण प्रसारक मंडळ, कौळखेड, ता.उदगीर, जि.लातूर यांचे दि.०९.०१.२०२३ चे पत्र

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत गुणाई शिक्षण प्रसारक मंडळ, कौळखेड, ता.उदगीर, जि.लातूर संचलित बिर्ला ओपन माइंडस इंटरनॅशनल स्कुल, जळकोट रोड, उदगीर, ता.उदगीर, जि.लातूर या शाळेस (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ली ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, राज्यमंडळ) स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरु करण्यास संदर्भ क्र.१ येथील पत्रान्वये मान्यता पत्र देण्यात आली आहे. सदर मान्यता पत्रातील शाळेचे मंडळ संलग्नता "राज्यमंडळ" ऐवजी "सी.बी.एस.ई." असे वाचावे.

प्र. स. पडोळे

(प्रदिप पडोळे)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी -

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक ,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई .
३. संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर.
७. निवड नस्ती एस एम २ (५३५/२१).

Secretary
Gunai Shikshan Prasarak Mandal
Kavalkhed Tq.Udgir Dist.Latur

Principal
Birla Open Minds
International School.Udgir

Seal

**Government of Maharashtra**
School Education Sport Department.
Mantralaya (Extention) Dalan no. – 432
Madam kama Road, Hutatama Rajaguru Chouk, Mumbai – 32
Email ID : sm2.sesd-mh@gov.in

No.: SFS-1021/Letter No. 535/SM-2

Date : 23rd Jan. 2023

**To,**
**President / Secretary**
**Gunai Shikshan Prasarak Mandal, Kaulkhed, Tq. Udgir, Dist. Latur**

NOTARY
Advocate
L. B. Shinde
Udgir Dist Latur
Reg No 20114
Exp.Dt 03/03/2025
GOVT.OF INDIA

Sub. :- Letter of approval for starting a new school on self-financing basis or upgrading Existing schools under the Maharashtra Self-financing Schools (Establishment and Regulation) Act, 2012...
- Run by Gunai Shikshan Prasarak Mandal, Kaulkhed, Udgir Dist. Latur
: Birla Open Minds International School, Jalkot Road, Udgir, Dist. Latur

Ref. :- 1. Approval Letter No. SFS-1021/Pro.No.535/ SM-2. d. 21.02.2022.
2. President, Gunai Shikshan Prasarak Mandal, Kaulkhed, District Udgir, Distt. Latur's letter dated 09.01.2023

Birla Open Minds International School, Jalkot Road, Udgir, Udgir, Dist. to Higher Secondary, etc. 1st to 12th, All Branches, English Medium, State Board) to start a new school on self-financing basis has been given vide reference no.1 letter. Board affiliation of the school in the said recognition letter is replaced by "CBSE" instead of "Board". It should be read like this.

Sd/-
(Pradeep Padole)
Cell Officer, Government of Maharashtra.

Copy for information-
1. Commissioner, Education, Maharashtra State, Pune,
2. State Project Director, Maharashtra Council of Primary Education, Mumbai
3. Director (Secondary & Higher Secondary), Maharashtra State, Pune..
4. Director (Primary), Maharashtra State, Pune.
5. Divisional Deputy Director of Education, Latur Division, Latur,
6. Education Officer (Primary/Secondary and Higher Secondary), Zilla Parishad, Latur,
7. Selection Nasti SM 2.535/21).

**BEFORE ME**

**Adv.L.B. Shinde**
**Adv.& Notary Govt.of India**
**UDGIR Dist.Latur**

**Secretary**
**Gunai Shikshan Prasarak Mandal**
**Kavalkhed Tq.Udgir Dist.Latur**

**Principal**
**Birla Open Minds**
**International School.Udgir**

NOTARY GOVT. OF INDIA

2 3 JUN 2023

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई -३२.
दूरध्वनी क्र:-
Email ID: sm2.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२१/प्र.क्र.५३५/एसएम-२

दिनांक:- २१ फेब्रुवारी, २०२२

## मान्यता पत्र

**प्रति,**

**अध्यक्ष / सचिव,**

**गुणाई शिक्षण प्रसारक मंडळ, कौळखेड, ता.उदगीर, जि.लातूर ४१३५१७.**

**विषय-** महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरु करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

**गुणाई शिक्षण प्रसारक मंडळ, कौळखेड, ता.उदगीर, जि.लातूर संचलित बिर्ला ओपन माइंडस इंटरनॅशनल स्कुल, जळकोट रोड, उदगीर, ता.उदगीर, जि.लातूर.**

**संदर्भ-** इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२१/प्र.क्र.५३५/एसएम-२, दिनांक २८.०९.२०२१.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **गुणाई शिक्षण प्रसारक मंडळ, कौळखेड, ता.उदगीर, जि.लातूर** या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून **बिर्ला ओपन माइंडस इंटरनॅशनल स्कुल, जळकोट रोड, उदगीर, ता.उदगीर, जि.लातूर (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ली ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम,राज्यमंडळ)** ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरु करण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून गुणाई शिक्षण प्रसारक मंडळ, कौळखेड, ता.उदगीर, जि.लातूर संचलित **बिर्ला ओपन माइंडस इंटरनॅशनल स्कुल, जळकोट रोड, उदगीर, ता.उदगीर, जि.लातूर (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ली ते १२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम,राज्यमंडळ)** स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळेचे बांधकाम सुरु करण्याकरिता, अटी व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. आता सदर शाळा सुरु करण्याची मान्यता, पुढील अटी व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे:-

३. अटी व शर्ती :-

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटीची व शर्तीची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या

Secretary
Gunai Shikshan Prasarak Mandal
Kavalkhed Tq.Udgir Dist.Latur

Principal
Birla Open Minds
International School.Udgir

निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तींचे आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशाने किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटीचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

(इ.मु. काझी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत माहितीसाठी -**

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई,
३. संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, लातूर विभाग, लातूर.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर.
७. निवड नस्ती एस एम २ (५३५/२१).

Principal
Birla Open Minds
International School.Udgir

Gunai Shikshan Prasarak Mandal
Kavalkhed Tq.Udgir Dist.Latur

(Seal)

**Government of Maharashtra**
**School Education & Sports Department,**
Mantralay (Extension), Dalan No. 432,
Madam Kama Road, Hutatma Rajguru Chowk, Mumbai – 32

Phone No :- Email ID : sm2.seed-mh@gov.in

---

No.: SFS-1021/Pra.Kra.535/SM-2 Date: 21 February, 2022

## Recognition Letter

**To,**
**President/Secretary**
**Gunai Shikshan Prasarak Mandal, Kaulkhed**
**Tq. Udgir Dist. Latur 413517**

Subject: Letter of Intent for starting new school or upgrading existing schools on Self Financing basis under Maharashtra Self Financing Schools (Establishment & Regulation) Act, 2012.
**Gunai Shikshan Prasarak Mandal, Kaulkhed Tq. Udgir Dist. Latur Runs Birla Open Minds International School, Jalkot Road, Udgir Tq. Udgir Dist. Latur**

**Reference**: Letter of Intent No. SFS-1021/Pra.Kra.535/SM-2 Date: 21/02/2022

**The Institution Gunai Shikshan Prasarak Mandal, Kulkhed Tq. Udgir Dist. Latur** had submitted an application under Maharashtra Self Financing School (Establisment & Regulation ) Act, 2012 for getting approval to its **Birla Open Minds International School, Udgir Tq. Udgir Dist. LaturPrimary to Higher Secondary School (Std. $1^{st}$ to $12^{th}$ , all faculties, English Medium, State Board)** from the academic year 2021-22 for the sake of recognition on Self Financing basis.

2. With reference to your application, Letter of Intent along with terms and conditions was given for starting new school on Self Financing basis under Maharashtra Self Financing School (Establishment& Regulation) Act, 2012 and Maharashtra Self Financing School (Establishment& Regulation) Rules, 2020. From the academic year 2021-22 to **Gunai Shikshan Prasarak Mandal, Kaulkhed Tq. Udgir Dist. Latur Runs Birla Open Minds International School, Jalkot Road, Udgir Tq. Udgir Dist. Latur(Std. $1^{st}$ to $12^{th}$ , all faculties, English Medium, State Board)on Self Financing basis.** Now The approval for starting the said new school hereby given subject to following terms and conditions:

**3. Terms & Conditions :**

1)The proposed school shall make fulfillment of all standards , criteria, terms and conditions prescribed by Children free and Compulsory Education Right Act, 2009 and Maharashtra Children free and Compulsory Education Right Rules, 2011 and the instructions given by the Government vide this Act or the criteria or standards or terms and conditions that are issued by the Government from time to time.

2) It is compulsory that the registered society or the trust or the company should follow all standards. terms and conditions prescribed by Maharashtra Self Financing School (Establishment & Regulation) Act, 2012 and the instructions given by the Government vide this Act or the criteria or terms and conditions prescribed by the Government from time to time.

3) It is compulsory for those school managements who are willing to take affiliation of C.B.S.E. or C.I.S.C.E. or C.A.I.E. or I.B. etc. boards, to take No Objection Certificate from the Government , as per the instructions given by the Government from time to time.

4) The school management shall prior to commencement of the academic year approved by Government, shall inform the Education officer of the concerned District.

5) As per the provisions of this Act, for the establishment of new school or for extension of standard of the school , the permission shall be for the same year, for which academic year, it has been approved.

6) If the school management fails to start the school within 18 months, then the letter of intent issued shall be cancelled.

7) The school management shall not be entitled to change the medium of education approved, place of school, in future, without the permission of the Government.

8) If the school management has established the school at different place from the place where the approval is given by the Government, then the approval of that school shall be terminated.

9) Provision is made to the effect that, the recruitment of teaching and non teaching staff in the Self Financing School be done as per the prevalent rules and regulations of the Government.

10) While filling the information District-wise the school who has been given approval, such school shall fill the information as independent category "Self Financing School" and shall obtain U.D.I.S.E number. In this regard, the State Project Director, Maharashtra Primary Education Council, Mumbai has been declared as a Nodal Officer.

11) The school management shall affix a board on the entry gate of the school Campus as "**Self Financing Approved School**".

NOTARY GOVT. OF INDIA

12) For the reason that any of the provision of this act or any of the rules made thereunder are violated or any of the instructions given vide this act or if falut is committed of the standard prescribed by the government from time to time or if the standards or terms and conditions are not followed , then State Government shall be entitled to terminate the Recognition Letter given, any time.

**Sd/-**
**(E.M. Kajhi)**
**Deputy Secretary, Government of Maharashtra**

**Copy for information:**

1. The commissioner (Education), Maharashtra State, Pune
2. The State Project Director, Maharashtra Primary Education Council, Mumbai
3. The Director ( Secondary and Higher Secondary), Maharashtra State, Pune
4. The Director ( Primary), Maharashtra State, Pune
5. The Divisional Deputy Director of Education , Latur Division, Latur
6. The Education Officer (Primary/Secondary and Higher Secondary), Zilla Parishad, Latur.
7. Nivad Nasti S M 2 (535/21)

NOTARY GOVT. OF INDIA

Secretary
Gunal Shikshan Prasarak Mandal
Kavalkhed Tq.Udgir Dist.Latur

BEFORE ME
Adv.L.B. Shinde
Adv.& Notary Govt.of India
UDGIR Dist.Latur
23 JUN 2023

# प्रमाणपत्र

**वाचा :-**

१. मुख्याध्यापक बिर्ला ओपन माईड्स इंटरनॅशलस्कुल उदगीर ता. उदगीर जि. लातूर यांचा प्रस्ताव दि. १२/०५/२०२३

२. मुख्याध्यापकयांनी यापुर्वी दिलेली मान्यता, परिशिष्ट-२, तपासणी अहवाल व इतर पुरावे सादर केलेली आहेत./

३. गटशिक्षणाधिकारी यांचा तपासणी अहवाल

४. या कार्यालयाची मान्य टिपणी दिनांक १5/ 5/२०२३

| | | |
|---|---|---|
| ग्राम | :- | उदगीर ता. उदगीर जि. लातूर |
| दुरध्वनी (संस्थेचा / शाळेचा) | :- | - |
| ईमेल (संस्थेचा / शाळेचा) | :- | - |
| जावक क्र. | :- | क्र./जिपला/शिविप्रा/कार्या- १३./सीआर- 1033 जि.प.लातूर दि. 15|05|2023 |
| जिल्हा शिक्षणाधिकारी यांचे कार्यालय, | :- | जिल्हा परिषद, लातूर |
| (जिल्हा / राज्य यांचेनाव ) | :- | महाराष्ट्र. |
| क्रमांक | :- | २७२८०७१३७६७ |
| व्यवस्थापक (संस्थेचे नाव) | :- | गुणाई शिक्षण प्रसारक मंडळ कौळखेड ता. उदगीर जि. लातूर |

**विषय :-** बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत..

आपला दिनांक १२/०५/२०२३ च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेलीतपासणी या आधारे मी शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद लातूर, दिनांक ०१/०४/२०२२ पासून दि. ३१/०३/२०२५ पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता १ ली ते ६ वी करीता बिर्ला ओपन माईड्स इंटरनॅशलस्कुल उदगीर ता. उदगीर जि. लातूर या शाळेस तात्पुरती देत आहे.

वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पुर्ततेच्या अधिन आहे :-

१. मान्यतेचाकालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ (जोडपत्र दोन) मधीलतरतुदीचे शाळा पालन करील.

३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५ % मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्णहोईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल./

४. परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी परिपुर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते उघडण्यात येईल.

५. संस्था / शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाणणी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी धर्म, जात किंवा वंश, जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पुर्णहोईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही

(दोन) कोणत्याही बालकास शारिरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पुर्णहोईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्णहोणे आवश्यक असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम २३ अन्वये विहीत केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदींनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३ (१) अन्वये निर्धारित पात्रतेची किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान २५ ... कालावधीत संपादित करावी लागेल

(सात) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेलीत्याची / तीची कर्तव्ये शिक्षक पार पाडतात आणि,

(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, यांची सुनिश्चिती शाळा करील.

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारीत केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारेतयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करेल.

९. शाळा, अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहीत केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागीलतपासणीच्या वेळेस शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणेहोत्या.

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ - ८६०० चौ.मी.
- एकुण बांधकाम क्षेत्र - १८५८ चौ.मी.
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ - ६००० चौ.मी.
- वर्ग खोल्यांची संख्या - १४
- कार्यालय - नि- भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली - ०५
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायीस्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल - होय.
- पिण्याच्या पाण्याची सुविधा - होय.
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वंयपाकघर - लागु नाही.
- अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रीडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता - होय.
- वाचन साहीत्य विनासायास उपलब्ध - होय.

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगणहे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्या येतील

१३. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० (१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा, कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तींसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तींच्या फायदयाकरीता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखेसनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याकडे पाठविण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक २७२८०७१३७६७असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपयातो नमुद करावा, याची नोंद घ्यावी.

१७. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहीती शाळेनेसादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पुर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सुचनांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नुतनीकरण केल्याचीसुनिश्चिती करावी.

१९. जोडपत्रतीन नुसार इतर शर्ती या सोबत जोडल्या आहेत.

**१. टिप :- १ ते १० मानके पुर्ण करण्याच्या अटीवर बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वये शाळांना आरटीई मान्यता प्रमाणपत्र देण्यात येत आहे.**

**२. मान्य तुकड्यानुसार विद्यार्थी प्रवेश द्यावेत जादा प्रवेश दिल्यास अमान्य राहतील.**

(विक्रमी फुटाणे)
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, लातूर**

**Principal**
**Birla Open Minds**
**International School.Udgir**

**Secretary**
**Gunai Shikshan Prasarak Mandal**
**Kavalkhed Tq.Udgir Dist.Latur**

## CERTIFICATE

**READ:**

1. Proposal of Head Master, Birla Open Minds International School, Udgir Tq. Udgir Dist. Latur Dt. 12/05/2023
2. The Head Master has submitted the approval given earlier, Appendix-2, Inspection report and other evidences.
3. Inspection Report of Block Education Officer.
4. The approved Comments of this office dated 15/05/2023

---

| | | |
|---|---|---|
| **Village** | :- | **Udgir Tq. Udgir Dist. Latur** |
| **Telephone No.(Institutions/School)** | :- | - |
| **Email ( of institution/school)** | :- | - |
| **Outward No.** | :- | **ZPL/EDP/Karya-13/CR-1033 Z.P. Latur Dated 15/05/2023** |
| **Office of District Education Officer** | :- | **Zilla Parishad, Latur** |
| **(Name of District/State)** | :- | **Maharashtra** |
| **No** | :- | **27280713767** |
| **Name of Manager ( Name of Institution)** | :- | **Gunai Shikshan Prasarak Mandal, Kaulkhed Tq. Udgir Dist. Latur** |

**Sub : Regarding grant of Approval Certificate to the Schools in view of Sec.18 of Right of Free and Compulsory Education Act 2009 of Children, as per Rule 11, Sub Rule(4) of Right of Free and Compulsory Education to Children Rules, 2011.**

With reference to your application dated 12/05/2023 and on the basis of postal correspondence made with the school / Inspection of the school undertaken. I, the Education Officer (Primary), Zilla Parishad Latur is granting provisional Approval to Birla Open Minds International School Udgir Tq. Udgir Dist. Latur for a period of three years from dated 01/04/2022 to dated 31/03/2025 for Std 1$^{St}$ to 6$^{th}$

**The above approval is subject to fulfillment of the following conditions :**

1. The period of approval shall not be extended and there shall not be binding to accord approval or affiliation after standard 8$^{th}$ in any situation.
2. The school shall comply with the provisions of Free and Compulsory Education to children Act. 2009 (Enclosure One) and Maharashtra Right of Free and Compulsory Education to children Act. 2011 ( Enclosure Two)
3. The school shall accord admission to the children belonging to weaker section and deprived section near to school in the 1$^{st}$ standard to the minimum 25% limit of students strength of that division and shall impart free and compulsory education to them till the primary education is completed however it is mentioned that, In case of divisions of preprimary also, this criteria shall be complied with.
4. For the children mentioned in Para No.3 the reimbursement shall be given to the school as per Sec 12(2) of the Act. Seprate bank account shall be given to the school for getting such reimbursement.
5. The institution/School shall not recover any capitation fees and shall not force the child or his or her mother father or guardian for any type of scrutiny system.
6. Admission shall not be declined to any child in the school, in the absence of age proof, for the religion, caste or race, birth place or for any of those reasons.
7. (One) Any child having given admission in the school, shall not be restricted in the same class in which he is studying or shall not be removed from the school till completion of primary education.

   (Two) No physical punishment or mental harm shall be given to any child.

   (Three) No child shall be required to pass the examination of any of the board till completion of primary education.

   (Four) Every child having completed the primary education, shall be given a Certificate prescribed as per Rule 23.

   (Five) Inclusion shall be made as per the provisions of the Act of Handicapped students in need of special needs.

   (Six) The teachers shall be appointed having minimum qualification prescribed as per Sec.23 (1) of the Act. However further it is mentioned that those teachers who are

not having minimum qualification on the date of beginning of the Act, shall have to obtain such minimum qualification within a period of minimum 05 years.

(Seven) The Teachers shall discharge his/her duties as mentioned in the Sec.24 (1) of the Act.

(Eight) The Male Teacher / Female Teacher should not engage himself/herself in the work of private coaching and it shall be ascertained by the school.

8. The school shall comply with the syllabus prepared on the basis of the study course prescribed by the concerned tribunal.
9. The students shall be given admission as prescribed in Sec. 19 of the Act and in comparison with the facilities available in the school.
10. It shall comply with the criteria and terms mentioned in the Sec. 19 of the School Act. At the time of last inspection, the facilities available in the school were as below.
    - Area of School Campus : 8600 sq.Mtr
    - Total construction area : 1858 Sq.Mtr
    - Total area of sport ground : 6000 Sq.Mtr
    - Number of Class rooms : 14
    - Office & Store & Room of Head Master : 05
    - Separate Toilets for boys & girls, where there shall be adequate water for use and for maintaining the toilets in a clean and hygienic condition : Yes
    - Drinking water facility : Yes
    - Kitchen for cooking meal of noon : Not required
    - Availability of Teaching study implements/sport and game related material / library : Yes
    - Reading material available easily : Yes
11. The Classes or divisions having no approval, cannot be operated in the name of the school, in the school campus or elsewhere.
12. The school building or other construction or sport ground can be used only for the purpose of education and the skill development only.
13. The school is being run by the institution registered under Societies Registration Act, 1860 (21 of 1860) or by the society registered under Mumbai Public Trust Act, 1950.
14. The School is not administered for the benefits of any person, group or the association of persons or for the benefit of any person or for fetching any profits.
15. The accounts of the school should be get duly audited and certified from the Chartered Accountant and the necessary account statements should be prepared as per rule One copy of every account detailed statement should be sent to The District Education Officer every year.
16. The approval code number received by your school is 27280713767. Please mention this number while making any postal correspondence with this office, which note.
17. The report and information sought by The Director of Education / District Education Officer from time to time should be submitted by the school or for the continuous fulfillment of the conditions of approval of the school or for removing the discrepancies in the working of the school, all instructions given by the Government or local authority should be complied with.
18. Whatever may be of the registration of the society, its renewal should be ascertained
19. Other conditions as per Enclosure Three are enclosed herewith.
    1. Note: The RTE Approval Certificate is issued to the schools on the condition of fulfillment of criteria 1 to 10, in view of Sec.18 of Right of Free and Compulsory Education Act 2009 of children, and as per Rule 11, Sub. Rule (4) of free and Compulsory Education to Children Act, 2011
    2. Admission of students should be given as per approved divisions. If excess admission is given, then it shall be disapproved.

Sd/-
(Vandana Phutane)
Education Officer (Primary)
Zilla Parishad, Latur

NOTARY GOVT. OF INDIA
Advocate L. B. Shinde Udgir Dist Latur Reg No 20114 Exp Dt 03/03/2025

BEFORE ME

Adv.L.B. Shinde
Adv.& Notary Govt.of India
UDGIR Dist.Latur

2 3 JUN 2023

Secretary
Gunal Shikshan Prasarak Mandal
Kavalkhed Tq.Udgir Dist.Latur

Principal
Birla Open Minds
International School.Udgir